**संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ**
**(नॅकद्वारा 'अ' मानांकन प्राप्त)**

**जनसंपर्क विभाग**

---

**विद्यापीठ बॉयोटेक्नॉलॉजी विभागाने बनविलेला सिलव्हर नॅनो मास्क कर्मचाऱ्यांना विनामूल्य पुरविणार – कुलगुरू**

अमरावती.

संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठातील बॉयोटेक्नॉलॉजी विभागाने सिलव्हर नॅनो मास्क तयार केला असून, कोरोनासह इतर विषाणुंपासून बचाव करण्याकरिता उपयुक्त आहे. प्राधिकृत संस्थेकडून मास्कचे टेस्टींग केले असून ग्रीन टेक्नॉलॉजीचा वापर तयार करण्यामध्ये करण्यात आला आहे. युजर फ्रेन्डली, युकोफ्रेन्डली असा हा मास्क जवळपास तीस वेळा धुतल्यानंतरही वापरता येतो.

विद्यापीठाचा बॉयोटेक्नॉलॉजी विभाग, अमोघ बॉयोसोल्युशन्स प्रा.लि. व एस.ए.आर. एंटरप्राईजेस प्रा.लि.मुंबई यांचे सहकार्याने विद्यापीठ कर्मचाऱ्यांसाठी ५०० माक्स विनामूल्य उपलब्ध करुन देण्यात आले असून विद्यापीठ कर्मचाऱ्यांना विनामूल्य पुरविल्या जाणार आहेत. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात झालेल्या छोटेखानी कार्यक्रमात पॅकबंद नॅनो मास्कचा डब्बा कुलसचिव डॉ. तुषार देशमुख यांना सुपूर्द केला. यावेळी बॉयोटेक्नॉलॉजी विभागाचे माजी विभाग प्रमुख डॉ. महेंद्रकुमार रॉय यांनी मास्क निर्मिती विषयी माहिती दिली.

कुलगुरु डॉ. मुरलीधर चांदेकर यावेळी म्हणाले, विद्यापीठाचे संशोधन समाजाभिमूख असावे असा येथील प्रत्येक घटकांचा प्रयत्न आहे. बॉयोटेक्नॉलॉजी विभागातील डॉ. अनिकेत गादे व डॉ. होमिभाभा स्टेट युनिव्हर्सिटी, मुंबई येथील डॉ. राजेश राऊत यांनी माजी विभाग प्रमुख तथा यु.जी.सी.बी.एस.आर. फेलो डॉ. महेंद्रकुमार रॉय यांच्या मार्गदर्शनाखाली सिल्व्हर नॅनो मास्क अतिशय कमी किंमतीत तयार केला असून कोरोना संसंर्गापासून सरक्षंण होणार असल्यामुळे सर्वांसाठी उपयुक्त ठरला आहे. कोरोना पार्श्वभूमिवर विद्यापीठाने सुरूवातीला विद्यापीठात परिसरात अमरावती शहरात पहिल्यांदा कोव्हीडची लॅब तयार केली. त्या लॅबच्या माध्यमातून आजवर ६० हजाराचेवर सॅम्पलची तपासणी करण्यात आली, त्यामुळे मृत्यू दर अतिशय कमी होण्यास मदत झाली. भविष्यात माझे सर्व सहकारी समाजासाठी जास्तीत जास्त संशोधन करतील व त्याचा फायदा समाजाला करुन देतील असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. राजेश जयपूरकर, कुलसचिव डॉ. तुषार देशमुख, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळाचे संचालक डॉ. डी.टी. इंगोले, अमोघ बॉयोसोल्युशन्स प्रा.लि. चे डॉ. दिनेश दांडेकर व एस.ए.आर. एंटरप्राईजेस प्रा.लि.मुंबईचे व्यवस्थापकीय संचालक श्री रमेश राऊत, जनसंपर्क अधिकारी डॉ. व्ही.आर. नांदुरकर उपस्थित होते. बायोटेक्नॉलॉजी विभाग प्रमुख डॉ. प्रसाद वाडेगावकर व शासकीय विज्ञान संस्था, मुंबईचे संचालक डॉ. जयराम खोब्रागडे यांचे या कार्यासाठी सहकार्य लाभले आहे.

---

प्रति, **जनसंपर्क विभाग**

मा. संपादक/जिल्हा प्रतिनिधी दि. २७/११/२०२०.

दै.............................. अमरावती.

मा. महोदय,

आपणांस विनंती करण्यात येते की, सोबतच्या वृत्तास आपल्या लोकप्रिय वृत्तपत्रातून कृपया प्रसिद्धी द्यावी, ही विनंती.

आपला,

**(डॉ. विलास नांदुरकर)**
जनसंपर्क अधिकारी